पोलीस कोठडीतील मृत व कारागृह
कोठडीतील अनैसर्गिक मृत व्यक्तीचे
शवविच्छेदनासाठी आदर्श शव विच्छेदन
अहवालाच्या फॉर्म तसेच शवविच्छेदन करतांना
घेण्यात येणा-या व्हिडीओ फिल्म
काढण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

परिपत्रक क्रमांक : एचआरसी-०५९७/६५/पोल - १४,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक : २२ फेब्रुवारी, २००१.

**वाचा :-**
१) शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक :एचआरसी-०९९५/३४/पोल-१४, दि.१८.१.९९
२) शासन परिपत्रक गृह विभाग क्र.एचआरसी-०५९७/६५/पोल-१४, दि.१०.९.९९
३) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे दि. ८ जून, १९९९ चे पत्र

**परिपत्रक :** संदर्भाधीन दि. १८.१.९९ च्या शासन परिपत्रकान्वयें पोलीस /कारागृह कोठडीत मृत्यू पावणा-या व्यक्तीचे शवविच्छेदन करतांना व्हिडीओ फिल्म घेण्याची जबाबदारी मुंबई शहरात अपमृत्यूनिर्णेता व जिल्हा/तालुका पातळीवर सिव्हील सर्जन यांची राहील असे नमुद करण्यात आले होते. त्यानंतर दि.१०.९.९९ च्या परिपत्रकान्वये बृहन्मुंबईत ही जबाबदारी शासन निर्णय गृह विभाग क्रमांक :सीआरए-०१९८/३४१४/४७/पोल-१४, दि.९.७.९९ अन्वये विहीत करण्यात आलेल्या आठ शवविच्छेदन केंद्र/रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांची राहील असे नमूद करण्यात आले आहे. यावर निरनिराळया क्षेत्रीय प्राधिका-याकडून आलेल्या सूचना लक्षात घेऊन शासन आता त्यामध्ये पुढीलप्रमाणे बदल करीत आहे.

" पोलीस /कारागृह कोठडीत / ताब्यात असताना मृत्यु पावणा-या सर्व व्यक्तींच्या मृतदेहाचे शवविच्छेदन ज्या ठिकाणी न्यायवैधक शास्त्राचा विभाग आहे, अश्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असणा-या शैक्षणिक रुग्णालयात करण्याची पध्दत राज्यात सर्व ठिकाणी अवलंबली जाते. तीच पध्दत बृहन्मुंबईत अवलंबण्यात यावी म्हणजेच असे शवविच्छेदन बृहन्मुंबईत ग्रान्ट वैद्यकीय महाविद्यालयात करण्यात यावे.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
2001
शाखा
प्र. लि. नि. जि. जिल्हाधिकारी

२. कोठडीत मृत्यु पावणा-या व्यक्तींच्या मृतदेहांचे शवविच्छेदन राज्यातील ज्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित शैक्षणिक रुग्णालयामध्ये करावयाचे आहे, अशी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये पुढील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय |
| --- | --- |
| १) | ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. |
| २) | बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे |
| ३) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज |
| ४) | डॉ.वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय,सोलापूर. |
| ५) | कै. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धुळे |
| ६) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद |
| ७) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , नांदेड |
| ८) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर. |
| ९) | इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर |
| १०) | स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगई |
| ११) | कै.श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ. |

३. उपरोक्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयतील संलग्नित शैक्षणिक रुग्णालये कि जेथे न्यायवैद्यकशास्त्र विभाग कार्यरत आहे, तेथे कोठडीत / ताब्यात असताना मृत्यु पावणा-या व्यक्तिचे शवविच्छेन व व्हिडीओ चित्रिकरण करणे व ते सीलबंद करुन ते त्वरीत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला पाठविणे ही जबाबदारी त्या त्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील न्यायवैद्यक पॅथॉलॉजीस्टची (Forensic pathologist) यांची राहील. शवविच्छेदन हे न्यायवैद्यक पॅथॉलॉजीस्ट यांनी दोन किंवा अधिक डॉक्टरांच्या पॅनेलसह करावे. व्हिडीओ ग्राफर हा फॉरेंसीक पॅथॉलॉजीस्टला इन्व्वेस्ट करणा-या प्राधिका-यान उपलब्ध करुन द्यावा व तो व्हिडीओग्राफर त्यांनी जिल्हादंडाधिका-याच्या अधिकृत पॅनेलमधून घ्यावा. व्हिडीओ चित्रीकरणावर येणारा खर्च हा प्रथम संबंधीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी करावा व तो नंतर संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक /कारागृह विभाग यांचेकडून वसूल करावा.

४. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या दिनांक ८ जून, १९९९ च्या पत्र व सहपत्राची प्रत पुन्हा माहितीसाठी सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ. ना. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति:

सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (मानवी हक्क) , महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा मुंबई
अधिष्ठाता ग्रान्ट मेडिकल कॉलेज, मुंबई.
डीन जे.जे.हॉस्पीटल, मुंबई
पोलीस सर्जन मुंबई
सर्व पोलीस आयुक्त
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस अधिक्षक,
अधिष्ठाता जे. जे. रुग्णालय, पोस्टमार्टेम सेंटर भायखळा, मुंबई
अधिष्ठाता राजावाडी रुग्णालय, पोस्टमार्टेम सेटंर, मुंबई
अधिष्ठाता कपूर रुग्णालय, पोस्टमार्टेम सेटंर जूहू , मुंबई
अधिष्ठाता सेंट जॉर्ज रुग्णालय, पोस्टमार्टेम सेंटर, मुंबई
अधिष्ठाता जे..टी.रुग्णालय, पोस्टमार्टेम सेंटर मरीन लाईन, मुंबई.
अधिष्ठाता के.इ.एम. रुग्णालय, पोस्टमार्टेम सेटंर, परळ मुंबई
अधिष्ठाता लोकमान्य टिळक रुग्णालय, पोस्टमार्टेम सेटंर, सायन मुंबई.
अधिष्ठाता टि.एन.नायर रुग्णालय , पोस्टमार्टेम सेटर, मुंबई सेंट्रल, मुंबई
अधिष्ठाता ग्रान्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
अधिष्ठाता बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.
अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज
अधिष्ठाता डॉ.वैशपायंन स्मृती महाविद्यालय,सोलापूर
अधिष्ठाता कै.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे
अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद
अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , नांदेड
अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.
अधिष्ठाता इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर
अधिष्ठाता स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगई
अधिष्ठाता कै.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.

***********